# ।। न्यात को संवाद ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ न्यात को संमाद लिखंते ।।

संता सुखरामजी ने न्यांत मे ब्राम्हणा केवा मेल्यो,तुम सुदर कूं अग्या देते हो,सोर्यीको जाब देणो पड़सी ।। तब संत सुखरामजी बोलीया ।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना जातीवाले गुजर गोड ब्राम्हणाद्वारे समाचार पाठविला की,आपण शुद्रांना भक्ती देतात.तर शुद्राला भक्ती देणे हा गुन्हा आहे व या गुन्ह्याचे उत्तर आम्ही जातवाल्यांना तुम्हाला द्यावे लागेल. ।।टेर।।

।। अरेंल ।।

पाँच तत्त का जीव,सरब ही होय रे ।<br>
अे चार बरण नर नार,माँड सब लोय रे ।।<br>
सुण याँ मे कहो कुण नीच,मान म्हे लेव सूं ।।<br>
हर हाँ ताँकूं के सुखराम,अग्या नही देव सूं ।।१।।

तेंव्हा आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी त्या जातीवाल्या ब्राम्हणाला सांगितले की चारी वर्णाच्या ब्राम्हणापासून शुद्रापर्यंत सर्व स्त्री–पुरुष आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी या पाच तत्वांचे आहेत.या जीवांमध्ये निच कोण आहे व उंच्च कोण आहे हे मला सतज्ञानाने समजवा. सतज्ञानात जो निच दिसेल त्याला मी आज्ञा नाही देणार ।।१।।

तुम मुज कूं कहो बिचार,नीच अे होय रे ।<br>
सो ताकूं संगत माँय,रखुं नही कोय रे<br>
अर नहि तर झूटो,बाद करो सो बावळा ।।<br>
हर हाँ अंत काळ के माय,गुन्ही व्हे रावळा ।।२।।

तुम्ही मला विचार करुन निच कोण आहे हे सांगा त्यांना मी माझ्या संगतमध्ये येऊ देणार नाही.जर ते निच नाही निघाले तर बहकलेल्या पागलांनो माझ्या सोबत खोटा विवाद का करतात.असा बावळटपणा कराल तर अंतकाळी रामजीचे गुन्हेगार व्हाल. ।।२।।

मही नीच कन अप,तेज कन बाय रे ।<br>
कन ब्रहमंड कहीये नीच,बतावो आय रे<br>
सुण सब शास्त्र जोय,खोजना कीजिये ।।<br>
हर हाँ यांको के सुखराम,जाब मुज दीजिये ।।३।।

हे सर्व देह पाच तत्वांचे आहेत.या पाच तत्वांमध्ये पृथ्वी निच आहे की पाणी निच आहे का अग्नी निच आहे का वायु निच आहे,की आकाश निच आहे,हे सतज्ञानाने समजवा.तुम्ही सर्व वेद,शास्त्र,पुराण पाहून पाच तत्वांमधीला कोण निच आहे याची खोज करा व मला उत्तर द्या. असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जातीवाल्या

ब्राम्हणाला बोलले. ।।३।।

अे पाँचु तो ऊँच,नीच भी नाय हे ।।
ओ ऊदबुद बणीयो खेल,कहयो नही जाय हे ।।
पिण क्रणी कहीये नीच,नीच सो धांम रे ।।
हर हाँ सो आद अंत सुखराम,बणायो राम रे ।।४।।

सतज्ञानाने हे पाची तत्व उंच ही नाही व निच ही नाहीत.असा हा रामजीचा खेळ अद्‌भूत आहे.अद्‌भूत खेळाचे वर्णन करता येत नाही.हा जीवांच्या करण्यांचा खेळ आहे.मागच्या जन्मात उंच करणी केली तो उंच्च घरात आला व त्याचे घरी ही उंच जागी आहे.निच करणी केली तो निच घरात आला व त्याचे घरही निच जागी आहे. निच करणीवाल्यांना निच घरात व उंच्च करणीवाल्यांना उंच्च घरात पाठविण्याचे काम सुरुवाती पासून शेवटपर्यंत रामजीच करत आले आहेत.अशा रामजीचे ज्यांना तुम्ही शुद्र म्हणतात ते भजन करतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले ।।४।।

करणी नांव समान,नही हे काय रे ।।
भक्त सरोभर धाम,नही जग माय रे ।।
अब काढो यामे बाँक,मधम कोई कीजिये ।।
हर हाँ सुण ज्यो के सुखराम,जाब मोय दीजिये ।।५।।

तर रामजीचे स्मरण करणे,अशी उत्तम करणी दुसरी कोणती ही नाही. रामनामाने, कोळी पासून वाल्मीक ऋषी बनून गेला,रामनामाने प्रल्हाद वाचविला गेला. रामनामाने, महादेवाला विषबाधा झाली नाही.रामनामाने शेषनागाने सर्व पृथ्वी उचलली.रामनामाने वैश्येचा उध्दार झाला,असे अनेक उदाहरण आहेत.रामनामाने निच जातीचे असूनही, उंच होऊन गेले.तर रामाचे नाम घेण्या सारखी करणी दुसरी कोणतीही नाही.तसेच भक्ताच्या बरोबरीचा दुसरा कोणता ही धाम म्हणजे तीर्थ संसारात नाही.कारण अड्डुसष्ठ तीर्थ,संतांच्या चरणात निवास करतात आणि संतांच्या चरणांची अशा करतात.तर भक्तासारखा धाम,संसारात दुसरे कोणी ही नाही.ज्या स्थानावर रामनाम घेणारे संत होऊन गेले,त्या स्थानाला महादेव बैलावरुन उतरुन आपले मस्तक झुकवतो इतका गुण ज्या जागेला येऊन जातो.मग गुणांचे काय सांगावे.असे रामाचे नाव घेण्यात काय वाईट आहे ते मला सांगा?आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सर्व जण ऐका आणि याचे मला उत्तर द्या. ।।५।।

।। न्यात वाळो व्यासो वोच ।।

यामे ओ सुण चूक,पेल सो करम कमाया ।।
शुद्र के घर जनम,दाव माटी मद खाया ।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

अब ही प्रणे शुद्र के अन वांरे ही खाय

हर हाँ इण कारण सुखराम,नीच क्वाया जाय ।।६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांचा जातीवाला गुनारढ्या व्यास गुरु महाराजांना बोलला की,तुमच्या संगतमध्ये येणाऱ्या या शुद्रांची ही चुक आहे की,यांनी पूर्व जन्मात निच कर्म केले या निच कर्मामुळे हे शुद्राच्या घरात जन्मले व तेथे मांस–माती खाऊन राहीले व दारु पिऊन राहीले असल्या कारणाने यांचा शुद्राच्या घरातच विवाह होतो व तेथे ही शुद्रच खाणे पिणे राहते.या कारणाने या लोकांना निच जातीचे लोक म्हणतात. असा तो व्यास आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना बोलला. ।।६।।

यामे ओ गण अेहे,शुद्र घर आविया ।

मद माटी अर गाय,ब्होत बाँ खावियाँ ।।

अर अब ही परणे जोय,नीच के जाय रे ।।

हर हाँअे लछण सुखराम,नीच के माय रे ।।७।।

आपल्या संगतमध्ये येणाऱ्या जीवांचा हा अवगुण आहे की,ते शुद्र घरात जन्मले.ज्या घरात सर्व लोक दारु पितात,मांस खातात व मेलेली गाय खातात.आता ही हे जेथे मांस,दारु व मेलेली गाईचे जेवण आहे.अशाच घराच्या मुलीशी विवाह करतात.या निच लक्षणामुळे यांची जात निच आहे.असे व्यास आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना बोलला. ।।७।।

सुखरामजी वाच ।।

ब्राम्हण करम कमाय,नीच जो थाय हे ।

तो शुद्र भजन परताप,ऊँच होय जाय हे।

अर यूं रिख के घर जीम,ऊत्तम नही कोय रे ।।

हर हाँ तो अेसे ही सुखराम,नीच नही होय रे ।।८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अरे ब्राम्हण,ब्राम्हणाच्या घरी जन्म घेऊन,निच कर्म करु लागला,तर तो ब्राम्हण ही निच जातीच्या श्रेणीचा होऊन जातो. आणि शुद्र ही भजन करुन भजनाच्या प्रतापाने उच्च श्रेणीचा होऊन जातो आहे. मातंग ऋषी,जातीने शुद्र होते.परंतु ते भजन करुन ऋषी होऊन गेले.चोखामेळा शुद्र होता,सजन हा कसाई होता.अशा अशा निच जातीचे भजनाच्या प्रतापाने उंच्च होऊन गेले.रोहिदास,हा जातीने शुद्र होता,शबरी ही भिल्लीन होती.अशा तऱ्हेने असे असे भजनाच्या प्रतापाने अनेक उंच्च होऊन गेले.अशा तऱ्हेने ब्राम्हणांच्या वंशात,निच कर्म करुन रावण,कुंभकर्ण हे ब्राम्हणांच्या घरी जन्म घेऊन,निच कर्म करुन राक्षस होऊन गेले.तर कोणत्याही उंच्च जातीचे,ऋषी म्हणजे ब्राम्हणाच्या घरी भोजन करणारा,उंच्च

होत नाही.मग निचच्या घरी खाण्याने,निच कसा होईल?(उच्च घरी खाल्ल्याने,उच्च होत असतील तर निचच्या घरी खाल्ल्याने नीच होईल)आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अशाप्रकारे उच्चच्या घरी खाल्ल्याने उच्च होत नाही,तर निचच्या घरी खाल्ल्याने निच ही होत नाही. ।।८।।

ब्राम्हण देहे कन जीव,जाब ओ दीजिये ।
रे पीछे सोच बिचार,बाद सो कीजिये
सुण थाँरे उत्तम कोण,देहे धर माय रे ।।
हर हाँ बूझे यूं सुखराम,बतावो आय रे ।।९।।

अरे,ब्राम्हण देह किंवा जीव आहे(देह आहे की जीव आहे)याचे मला उत्तर द्या.मग नंतर समजून,विचार करुन माझ्याशी विवाद करा.ऐका,या तुमच्या शरीर घरात उत्तम कोण आहे?हे मला सांगा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जातीवाल्या ब्राम्हणाशी बोलले.।।९।।

ब्राम्हण देहे नही जीव,नही धर कोय रे ।
आ बचना की मरजाद,बिराम्हण होय रे ।
यां तीना बांधी मेर,आद ठेराविया ।।
हर हाँ यूं ब्राम्हण सुखराम,जुगे जुग गाविया ।।१०।।

हा देह ही ब्राम्हण नाही आणि ब्राम्हणाचे घर हे ही काही ब्राम्हण नाही.ही वचनाने बांधलेली मर्यादा आहे.अशी ही वचनाची बांधली गेलेल्या मर्यादेने ब्राम्हण होतात. ब्रम्हा, विष्णू,महादेव या तिघांनी ही मेर बांधून,ब्राम्हणांना आदिचा ठरवला आहे.यातऱ्हेने हे ब्राम्हण,युगा-युगापासून म्हणवितात. ।।१०।।

अे तो जात न पांत,भक्त बी नाय हे ।
अे क्रणी करतूत,असुभ नही क्वाय हे ।
यां को करो बिचार,तत्त सो छाणिये ।।
हर हाँ ओ ऊँच नीच सुखराम,कोण कूँ जाणिये ।।११।।

ही पाची तत्वाची कोणती जाती नाही आणि कोणती पाती नाही आणि हे पाची तत्व भक्त ही नाहीत.तसेच यांची करणी आणि करतूत अशुभ ही नाही.याचा विचार करुन या पाच तत्वांचा निर्णय करा.याच्यात पाच तत्वांमध्ये उच्च आणि निच कोणाला जाणावे? जर या पाच तत्वांमध्ये उंच्च व निच नाही आहे तर हे पाच तत्वांचे बनलेले सर्व उच्च आणि निच कोणी नाही. ।।११।।

ऊँच नीच हे केण,ओर कुछ नाय रे ।
सुण सुख दु:ख करणी,लार भुगत्ते जाय रे ।

सब जाताँ ब्होहार,बरण सब पेक हे ।।

हर हाँ सब केबत सुखराम,मूळ धूर अेक हे ।।१२।।

हा देह उच्च आणि निच फक्त म्हणायला आहे. आणखी काही ही नाही. हा जीव सुख दु:ख,आपल्या करणीच्या प्रमाणाने(चांगल्या कर्मांचे सुख आणि वाईट कर्मांचे दु:ख,जेथे जातो तेथे आपल्या आपल्या करणीच्या प्रमाणाने सुख आणि दु:ख भोगतो आहे)सर्व जातींमध्ये व्यवहारात,सर्व वर्णांमध्ये आणि सर्व जागी बघून घ्या.सर्व ही सुख दु:ख भोगत असतात.(उच्च वर्णांचे ही,कितीही वेळा दु:खी होऊन जातात आणि निच वर्णाच्या जातीत ही सुख येऊन जाते)सुख आणि दु:ख आपल्या करणीच्या प्रमाणाने, सर्व उच्च आणि निच जातीत पाहून घ्या आहे की नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की हे उच्च आणि निच जातीची फक्त सांगण्याची गोष्ट आहे.सर्व वर्णांचे मूळ घर म्हणजे सर्व प्रथम आदि घर तर एकच आहे. ।।१२।।

आ ऊँच नीच की केण,झूट नही कोय रे ।

सोयाँ आपस के बीच,बंधी हे जोय रे ।

तीन लोक लग सुभ,असुभ सत्त जाणिये ।।

हर हाँ चोथे मे सुखराम,अेक कर ठाणिये ।।१३।।

ही उच्च आणि निचची सांगण्याची गोष्ट काही खोटी नाही आहे.जी यांनी आपसात,मेर मर्यादा टाकून बांधून दिली आहे.तर ही मर्यादा तीन्ही लोकांपर्यंत शुभ(चांगली)आणि अशुभ(वाईट)आहे हे सत्य आहे असे समजा.परंतु आमच्या चौथ्या लोकात हे सर्व एक होऊन जातात.चौथ्या पदात चालले गेल्यावर,तेथे उच्च आणि निच,चांगले आणि वाईट याचा भेंद भाव मिटून चौथ्या पदात जाणारे,तेथे चौथ्या पदात सर्व एक होऊन जातात.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१३।।

।। इति न्यात को संवाद संपूरण ।।